Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# बालसाहित्यातील भाषाशैली

*सचिन शंकर पालवे*
*सहायक प्राध्यापक*
*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ*

## गोषवारा / शोधसारांश

कोणतीही भाषा प्रथम बोलण्यात आणि नंतर लिहिण्यात येत असते. लेखन परंपरा जास्तीत जास्त सहा हजार वर्ष मागे नेता येते. मौखिक परंपरा, लेखन, मुद्रण, नंतर इलेक्ट्रॉनिक परंपरेकडे अशा साधारणतः भाषिक आविष्काराच्या अवस्था दिसतात. लिखित असणारी भाषा ही मौखिक भाषेचे रूपांतर आहे, हे भान भाषिक दृष्टिकोनातून साहित्य अभ्यासतांना ठेवले आहे. बालसाहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र वाङ्मय, विद्यार्थी वाङ्मय हे प्रमुख साहित्य प्रकार आपल्याला समाविष्ट झालेले आपणास दिसून येतील. या सर्व साहित्यप्रकाराच्या मुळाशी भाषा माध्यम म्हणून कार्य करीत असते. बालसाहित्य किंवा बालवाङ्मय असा शब्दप्रयोग करतांना बालकांसाठी लिहिलेले, बालमानसशास्त्र समजून घेऊन लिहिलेले साहित्य असा त्यातील मतितार्थ अभिप्रेत असतो. बालसाहित्यातील लेखकाने अभिव्यक्तीसाठी निवडलेला आशय, भाषाशैली, वाङ्मयप्रकार यांचा संयोग घडून येतांना जी विविध तंत्रे वापरली जातात त्या तंत्राचा अभ्यास बालसाहित्य निर्मितीच्या अभ्यासात आवश्यक ठरतो.

## प्रस्तावना

आत्मप्रकटीकरणाच्या आंतरिक प्रेरणेतून भाषा निर्माण झाली, यामुळे भाषा ही मानवाला अर्जित करावी लागते. बालकाच्या संवादाची रडणे, आवाज काढणे, हुंकार देणे, बडबडणे, हातवारे/खाणाखुणा, चेहऱ्यावरचे हावभाव ही सर्व वाचापूर्व रूपे आहेत, शेवटी शब्दांच्या माध्यमातून मूर्तरूप देऊन बालक भाषा शिकत असल्याचे आपणास दिसून येईल. भाषेच्या शोधामुळे मानवाचे विचार, कल्पना, ज्ञान, अनुभव, कला, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेले आहे. परिणामी, संबंध मानव समूहाच्या प्रगतीकरिता भाषेचे स्थान महत्तवपूर्ण आहे, यामुळेच भाषा ही एक सामाजिक संस्था ठरते. केवळ साहित्यनिर्मिती साठी भाषेची निर्मिती झालेली नाही. भाषा ही साहित्यनिर्मितीमध्ये माध्यम किंवा साधन म्हणून कार्य करते. लेखक आपल्या प्रतिभासामर्थ्याने बोलीभाषा,व्यवहारी भाषा , शास्त्रीय भाषा, भाषेतील व्याकरणाच्या नियमांना मुरड घालून अपूर्ववस्तू भाषाशैली निर्माण करीत असतो. त्या शैलीवर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला आपणास दिसून येईल. बालसाहित्याचा संदर्भात भाषा आणि शैलीचा विचार करतांना, बालकांच्या भाषिक, तार्किक, भावनात्मक, सर्जनशील, बोधात्मक विकासाच्या अवस्था व लहान मुलांचे भावविश्व,समजून घेऊन साहित्य निर्मिती करायला हवी, कारण आकलनसुलभता आणि वाचनीयता हे बालसाहित्याचे प्राथमिक निकष मानले जातात.

## मुख्य शब्द

साहित्य, साहित्यप्रकार , बालसाहित्य, भाषा, शैली, बालमानसशास्त्र,

## बालसाहित्यातील कथात्मक वाङ्मय

लीलावती भागवत यांच्या मते, 'बालसाहित्य या शब्दापेक्षा बालवाङ्मय हा शब्द अधिक युक्त वाटतो. कारण मुलांच्या बोलण्यातून या वाङ्मयाचा जन्म होतो. वाङ्मय याचा शब्दशः अर्थ घेऊन आपण असे म्हणू शकतो की 'वाणीमय' - म्हणजे तोंडातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द हा वाङ्मय होऊ शकतो. लहान मुले क्षणोक्षणी ही वाङ्मयनिर्मिती करीत असतात. मला असे वाटते की कल्पनाशक्तीला आवाहन करणारे, रिझवणारे, लहानांच्या तोंडून बाहेर पडणारे किंवा लहानांच्या मनात शिरून त्यांची भूमिका जगणाऱ्या मोठ्यांच्या तोंडून बाहेर पडणारे

शब्द, वाक्ये हे बालवाङ्मय म्हणता येईल. हाच लिखित साहित्याचा मूळ पाया आहे. लिखित साहित्याची 'वाङ्मय' ही पहिली पायरी आहे. म्हणूनच मुलाला बोलता येणारे शब्द, मुलांना वाचून दाखवणारांनी उच्चारलेले, प्रत्यक्ष बोलता न येणाऱ्या मुलांनाही कल्पनेने त्या उच्चारांवरून समजणारे शब्द यांनी निर्माण होणारे वाङ्मय हे बालवाङ्मय ठरते.'

निर्मितीशीलता हा भाषेचा विशेष आहे. निवडक ध्वनीच्या माध्यमातून अमर्याद शब्दांची व वाक्यांची निर्मिती करता येते. पूर्वी कधीही न उच्चारलेले शब्द आपणास निर्माण करता येतात. मानवी भाषेच्या ह्या निर्मितीच्या मुळाशी एक सर्जनशीलता दडलेली आपणास दिसून येते. मौखिक परंपरेने पिढ्यान-पिढ्या घरातील वयस्कर मंडळी, आजी - आजोबा बालकांना गोष्टी सांगत आलेल्या आपणास दिसून येईल, गोष्ट सांगत असतांना ही मंडळी ती कथानक रचत असतात, त्या कथनात भाषेचा सर्जनशील वापर होत असतो. वाक्यांची रचना, कल्पना व भावना यांचा संयोग, त्याचप्रमाणे कल्पनेच्या आधारे कल्पित विश्वाची निर्मिती, वाक्यरचनेतून निर्माण होणारे नादसौंदर्य, वर्णनातले तपशील संवाद, नाट्यमयता, अनुभवांची रूपकात्मक मांडणी, अशा अनेक घटकांमुळे कथा ललितरम्य होते. अशा भाषिक कृती आपण जाणते-अजाणतेपणी करीत असतो. सारांश, गोष्ट सांगणे व गोष्ट ऐकणे ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे. आपल्याला आलेला अनुभव कथन करतांना आपण दुसऱ्या व्यक्तीला सहभागी करून घेतो, यामुळे कथन हे सुद्धा एक आत्माविष्काराचे रूप ठरते.

बालसाहित्यामध्ये कथनाचे अनेक प्रकार आढळून येतात. यामध्ये प्रामुख्याने गद्यात्मक साहित्यात कथा, कादंबरी हे दोन प्रकार व त्याचे उपप्रकार नीतिकथा, लोककथा, रूपककथा, चरित्र, प्रवासवर्णन, प्राणीकथा, पौराणिक कथा, वास्तव कथा, वैज्ञानिक, नाट्यकथा, अद्‌भुतरम्य, वीरकथा, परीकथा, इत्यादी सर्व प्रकारात कथात्मकता हा सामान्य गुणधर्म असल्याचे आपणास दिसून येईल. कथात्मक साहित्यातून कथेतील वातावरण, कथनपद्धती, पात्ररचना, भाषा, अशा घटकातून कथात्मक साहित्याचे एकजिनसी, सेंद्रिय स्वरूपाचा रूपबंध प्राप्त होत असतो,

३ ते ८ वर्षे वयोगटासाठी लिहिलेल्या साहित्याचा समावेश शिशुसाहित्यात करता येईल. पुढे अनुक्रमे बाल, किशोर साहित्याचा समावेश बालसाहित्यात होतो, शिशुसाहित्यात मुलांकडून वाचन करून घेण्यापेक्षा सोपी गाणी, छोट्या गोष्टी यावर कथन आणि पाठांतर या स्वरूपात मुख्यत्वे भर दिला जातो. बालसाहित्याची रूपरेखा या मालतीबाई दांडेकर यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री. गोपीनाथ तळवलकर यांनी म्हटले आहे. 'केवळ भाषा सोपी असून उपयोग नाही तर तर ती गोचर वर्णपद्धती असली पाहिजे. जे वर्ण्य आहे ते मुलांच्या डोळ्यासमोर उभे राहिले पाहिजे.'
कठीण शब्द वगळले की ध्येय साध्य होईल असे नाही. आशय बिनागुंगुंतीचा, सुस्पष्ट आणि निश्चित आकार डोळ्यासमोर उभा करील असा असावा. बालकामध्ये क्रीडाप्रवृत्ती असल्यामुळे गद्या-पद्यमिश्रित भाषा शिशुसाहित्यात वापरायला हवी. कमीत कमी घटना-प्रसंगावर आधारित गोष्टी रचना करायला हवी. उदा. 'चाल रे, भोपळ्या टुणूक टुणूक ! 'ही कथा मुद्रणपूर्व काळापासून मौखिक परंपरेने सर्वांना ज्ञात आहे. मौखिक परंपरेतील आविष्काराला तालाला अधिक महत्त्व असते, कथनामध्ये नाट्याला महत्त्व असते.
'' एक होती वाडी. तिथे होती माडी. माडी होती उघडी. माडीवर राहत होती धोंडी. आईचे नाव होते कोंडी. धोंडीने केली खोडी. आईने दाखवली छडी. ''

या कथानकात छोटी- पद्यात्मक भासणारी वाक्यरचना व त्यामुळे कथानकात रंजकता निर्माण झाली आहे. बालकांच्या स्वानुभवाचे वर्णन आल्यामुळे मुले या अश्या गोष्टीत अधिक समरस होतात. या गद्य-पद्य मिश्रित गोष्टीत लयबद्ध शब्दाच्या योजनेमुळे तालबध्दता निर्माण होऊन ती श्रवणीय झाल्याची आपणास दिसून येईल. यासारखी कितीतरी उदाहरणे आपल्याल्याला सांगता येतील

मुलांना अक्षरओळख व वाचनाची गोडी लागावी, कल्पनाशक्तीला व विचारशक्तीला चालना मिळावी यासाठी सोप्या शब्दात मुलांच्या नेहमी कानावर पडणाऱ्या भाषेत त्यांना परिचित असणाऱ्या प्रसंगाची जाणीव ठेऊन कथानकाची रचना करायला हवी. भाषा आणि शैली यावर कोणत्याही कथनात्मक साहित्याची परिणामकारकता

अवलंबून असते. कथा, कादंबरीच्या कथानकात हुबेहूब भोवतालच्या जगातील व्यक्तींचे व घटनांचे चित्र नसते तर ते एक कल्पित विश्व असते याची जाणीव ठेऊन भाषा अधिकाधिक अर्थसंपन्न हवी. कथनात्मक साहित्याच्या आशयानुसार भाषा बदलत असते, (उदा. पौराणिक, ऐतिहासिक, काल्पनिक,वास्तवदर्शी, विनोदी, तार्किक,) ती पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार बदलतांना दिसते.

लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा, त्याच्या जीवनविषयक व वाङ्मयीन भूमिकेचा परिणाम भाषाशैलीवर होत असतो. ही महत्त्वाची गोष्ट साहित्यनिर्मिती करतांना लक्षात घेण्याचे कारण म्हणजे, बालपणी मुलांनी वाचलेल्या साहित्याचा निरंतर प्रभाव मुलांवर असतो, परिणामी त्याच्या व्यक्तिमत्वाच्या जडण-घडणीवर त्याचा परिणाम होत असतो. सारांश, मुलांमध्ये साहित्यिक अभिरुची वृद्धिंगत करण्याचे बालसाहित्य पाया आहे असे म्हटले तर चुकिचे ठरणार नाही.

समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मते, ' वेगळ्या जाणीवा वेगळी भाषाशैली निर्माण करीत असतात. ' यामुळे बालकाच्या जाणीवा केंद्रस्थानी मानून बालसाहित्याची भाषाशैली असावी. शिशु, बाल, किशोर या तिन्ही अवस्थेत मुलाच्या जाणीवा, प्रेरणा, प्रवृत्ती, वेगवेगळ्या असतात. त्याचप्रमाणे त्यांच्या अवतीभोवती असणारा परिवेश, पर्यावरणामध्ये सातत्याने व जलदगतीने बदल घडत असतो. मुलाच्या वाढीच्या आणि विकासाच्या या प्रत्येक टप्प्यावर त्यांचा भाषिक विकास होत असतो, याची जाणीव बालसाहित्यात भाषेचे उपयोजन करतांना ठेवायला हवी.

## बालसाहित्यातील पद्यात्मक वाङ्मय

## बालकविता

बालपणी मुले शांत चित्ताने अंगाईगीत ऐकतांना आपणांस दिसून येईल. मौखिक परंपरेने चालत आलेल्या या अंगाईगीतांचा बालकांना जरी अर्थबोध होत नसला तरी या गीताच्या माध्यमातून मुलांना स्वर,ताल,लयबद्धता याची जाणीव अप्रत्यक्षपणे करून दिली जाते. बालकांमधील असलेली शैशववृत्ती ही निर्मितीशीलतेचा विशेष मानला जातो. उदा. लहान बालक पहिल्यांदा कोणतेही फळ, फुल, खेळणी बघत असेल तर उपजत कुतूहल व जिज्ञासेपोटी सर्वप्रथम ते आपल्या ज्ञानेंद्रियामार्फत ,स्पर्श, रंग, रूप, चव, गंध या दृष्टिकोनातून संवेद्यशिलतेनें त्यातील नावीन्य शोधत असते. असा सार्वकालिक अनुभव प्रत्येकाने कधीकाळी घेतला असेल. या उदाहरणाचे तात्पर्य इतकेच की कविता या साहित्य प्रकारचे घटक अभ्यासतांना लयबद्धता, नादप्रधानता, अनेकार्थता, अल्पाक्षरत्व, जीवनानुभव संवेदनशीलता हे मूळ घटक लक्षात घेऊन कवितेचे मूल्यनिर्धारण करीत असतो. बालकवितेसंदर्भात या पैलूंचा विचार कवितेची संवेद्यता ह्या महत्त्वाच्या पैलूवर भर देणे आवश्यक ठरते

बालकवितेत शब्दांद्वारे नाद, स्पर्श, गंध, रस, रंगरेषा या विविध संवेदनेचा ऐंद्रिय प्रत्यय देणे अपेक्षित असते. कवितेत शब्दाच्या भावनाप्रधान अर्थरूपाप्रमाणेच नादरूपालाही महत्त्व आहे. अनुभवांची ऐंद्रिय प्रतीती येण्यासाठी कवितेची भाषा अन्य साहित्यप्रकार व कथनात्मक साहित्यापेक्षा प्राचुर्याने संवेद्य स्वरूपाची असावी. ही संवेद्यता भाषेची लयबद्धता, नादमयता, नादबंध, शब्दकला , प्रतीक- प्रतिमा इत्यादींमधून निर्माण होत असते. कविता ही मुलांच्या आंतरिक भावविश्वाला स्पर्श करणारे एक साधन आहे. मुलांना विषयाचे वैविध्य असणारी, ज्ञानेंद्रियांना आव्हान करणारी, वास्तव किंवा अवास्तव यातील भेद मिटवणारी, कल्पनाशक्तीने परिपूर्ण, अभिनयप्रधान, भावनेने युक्त, विनोदी अशा स्वरूपाच्या कवितेत मुले अधिक रस घेतात.

वि. द. करंदीकरांच्या मते, 'मुलांची सौंदर्यभावनेची व्याप्ती मर्यादित असली तरी, ती स्वभावतःच हेतुनिरपेक्ष असल्यामुळे तिला निरर्थक शब्दाकडून अर्थपूर्ण शब्दाकडे व अर्थपूर्ण शब्दाकडून निरर्थक शब्दाकडे सहज प्रवास करता येतो. सगळेच कळले पाहिजे असा आग्रह नसतो. तपशीलाची मोड ते मोजत नाहीत, तर एकात एक गुंफलेल्या साखळीसारख्या रचना, वक्रीय कल्पनाविलास , पायरीपायरीने वाढत जाणारा उत्सुकताप्रधान घटनाक्रम, या अशा रचनापद्धतीत त्यांची सौंदर्यवृत्ती रस घेऊ शकते.'

डॉ. सुलभा शाह यांच्या मतानुसार ' बालकांच्या मनोवृत्ती लक्षात घेऊन बालकविता लिहायला हवी. त्यात अभिनयाला वाव हवा. गेयप्रधान असावी, स्वातंत्र्यपणे गुणगुणता आली पाहिजे.'

मुलांची आकलनसुलभता, आवडी-निवडी, त्यांचे विविध छंद, खेळ, पशुपक्ष्याविषयी त्यांना वाटणारे आकर्षण, बालमनाला पडणारे प्रश्न, त्यांच्या कल्पना या गोष्टींचा विचार करून लिहिलेली बालकविता वैशिट्यपूर्ण म्हणता येईल. सारांश, भाषिक दृष्टीने, सोपे शब्द, पुनरावृत्ती, नादमाधुर्य, तालबध्दता, शब्दांचा संदर्भ, घटनेचा क्रम, ह्या हे घटक बालगीते, बालकविता यामध्ये आवश्यक ठरतात.

## निष्कर्ष

समाज माध्यमांचा वाढत्या वापरामुळे भाषेची अभिव्यक्ती, सादरीकरणाच्या माध्यमातून जास्त प्रमाणात होतांना दिसते. यांत्रिकी अविष्कारामुळे पूर्वीच्या तुलनेत सध्या बालकांच्या जाणीवा आणि अनुभवविश्व अधिक समृद्ध असला तरी ; मौखिक परंपरेतील अविष्कार व वाचनातून मिळणारा, ऐंद्रिय संवेदनासह एकात्म स्वरूपाच्या साहित्यानुभवाशी मुले तादात्म्य पावतात, हे काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेले आहे. शिशू, बाल, किशोर या तीनही अवस्थेत मुलांच्या प्रेरणा, प्रवृत्ती, जाणीवा वेगवेगळ्या असतात, त्याचप्रमाणे त्यांचा भाषिक विकासही याकाळात होत असतो. याची जाणीव ठेऊन बालसाहित्याचा आशय आणि भाषेची अभिव्यक्ती असावी. किशोर साहित्याची भाषा शैली प्रौढ साहित्याच्या भाषेशी मध्यस्थाची भूमिका बजावणारी हवी.

परिवर्तनशिलता आणि लवचिकता हे भाषेचे व्यवच्छेदक लक्षण आहे, यामुळे काळाच्या ओघात भाषेत आजपर्यंत अनेकदा परिवर्तन होत असले तरी; आशय, भाषा, आणि वाङ्मयप्रकार यांच्या मध्ये अद्वैत आहे. साहित्य निर्मिती ही व्यामिश्र, गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. प्रस्तुत शोधनिबंधात बालसाहित्याच्या भाषेचा प्रमाणवादी संकल्पनेतून विचार करण्याचा प्रयत्न केला आहे, भाषेच्या स्वभाववादी दृष्टीकोनातूनही आपणाला बालसाहित्याच्या भाषेचा विचार करता येईल.

## संदर्भग्रंथ

मालशे, स. ग.,इनामदार हे. वि. संपा,-भाषाविज्ञान:वर्णनात्मक आणि ऐतिहासिक,संजय प्रकाशन,पुणे १९८२
समीक्षा-संज्ञा,मराठी वाङ्मयकोश,खंड चौथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, २००२
दांडेकर,मालतीताई:बालसाहित्याची रूपरेखा,मराठी ग्रंथ संग्रहालय,मुंबई.
भागवत,लीलावती:मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप
शाह,सुलभा:मराठी बालवाङ्मय स्वरूप आणि अपेक्षा,लीलावती प्रकाशन,
काळे,प्रेमला:बालमानसशास्त्र
बागुल,देविदास:बालवाङ्मय,लोखंडे प्रकाशन,पुणे, १९६०
संपादक डॉ. उज्वला मेहेंदळे:बालसाहित्य:स्वरूप आणि व्याप्ती,ग्रंथाली प्रकाशन
शरणकुमार लिंबाळे ( संपादित ) - साठोत्तरी मराठी वाङ्मयीन प्रवाह, दिलीपराज प्रकाशन
https://weeklysadhana.in/view_article/lilavati-bhagwat-on-what-should-childrens-literature-be-like